0001

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :-

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.०२/०४/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२५/२०१२/जा.१९९, दिनांक ०२/०४/२०१२.
३) मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांचे दि. ०३/०४/२०१२ रोजीचे निवेदन.
४) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२५/२०१२/जा.२०६, दिनांक ०३/०४/२०१२.
५) मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी यांचे दिनांक ०४/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२५/२०१२/जा. २७८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ३० /०४/२०१२.

आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)

प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २९/०३/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी त्यांचे अधिकारी/कर्मचारी पथक व पंचांसह मे. श्री सप्तश्रृंगी ऑईल कंपनी, ९/१२, चिराग हाऊस, सेक्टर १८, गोकूळ डेअरी जवळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०५ येथे भेट देऊन नमूद कंपनी व कंपनीचे वेअरहाऊसमधील पामतेलाच्या साठ्याचे मोजदादचे काम सुरु असतांना वेअरहाऊसमधील गोदाम क्र. २, ६ व ८ या तीनही गोदामात मोठ्या प्रमाणावर कडधान्याचा साठा साठवणूक केल्याचे आढळून आले.

उपरोक्त नमूद तीनही गोदामात साठवणूक केलेल्या कडधान्याच्या साठ्याबाबत कंपनीचे व्यवस्थापक महेश द्वारकानाथ राठी यांना पंचांसमक्ष अधिक विचारणा केली असता, त्यांनी सदरचा साठा हा त्यांच्या मालकीचा नसल्याचे सांगून तो मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशनचा असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर कडधान्याच्या साठवणूकीकरिता शिधावाटप यंत्रणेचा, अन्न व औषध प्रशासन विभागाचा अथवा संबंधित महानगरपालिका यांच्याकडून आवश्यक असणारा परवाना सादर करण्याच्या सुचना दिल्या असता उपस्थित व्यवस्थापक महेश राठी

यांनी संबंधित प्राधिकरणाकडून आवश्यक परवाना प्राप्त करुन न घेतल्याचे सांगून त्याकरिता अर्जही केला नसल्याचे सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी सदरचा साठा मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशनच्या मालकीचा असल्यास साठा संबंधिचे कागदपत्र, सदर साठवणूकीकरिता मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन सोबतचा करारनामा व सदर कडधान्याच्या साठ्याचे साठवणुकीचे दिनांक व इतर तपशिल असलेले साठापुस्तक सादर करण्यास सांगितले असता, उपस्थित व्यवस्थापक यांनी सदर कडधान्याचा साठा हा मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन यांनी आयात केल्याचे सांगून सद्य:स्थितीत त्यांच्याकडे याबाबतचे कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे सांगितले. तसेच मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन सोबत कडधान्य साठवणूकीसाठी कोणताही करारनामा केला नसल्याचे सांगून त्यांच्याकडे साठापुस्तक व साठवणुकीचे दिनांक सहित तपशिलही उपलब्ध नसल्याचे सांगितले.

सदर कडधान्याच्या साठ्याचे मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे व्यवस्थापक महेश द्वारकानाथ राठी व पंचांसमक्ष अधिकाऱ्यांनी कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या मदतीने प्रत्यक्षात मोजदाद केली असता, ती खालीलप्रमाणे आढळून आली.

गोदाम क्र.	कडधान्याचा प्रकार	कडधान्य साठा (बाचक्यांमध्ये)	एकूण साठा (मे. टन मध्ये)
२	काळे उडिद	४६८२	२३४.१००
६	मसूर	११५०४	५७५.२००
८	हिरवे मुग	९७००	४८५.०००
	एकूण कडधान्याचा साठा	२५८८६	१२९४.३००

अधिकाऱ्यांनी उपरोक्त बाब गंभीर असल्याचे व साठवणूक केलेला कडधान्याचा साठा हा विनाखरेदी बिलांचा अथवा विना परवाना असल्याचे उपस्थित व्यवस्थापक यांच्या निदर्शनास आणून दिली व सदर कडधान्याचा साठा आयात केला असल्यास आयात संबंधिचे बिल ऑफ एन्ट्री व केंद्रशासनाने तसेच महाराष्ट्र शासनाने निर्देशित केल्यानुसार नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या कार्यालयात सादर करण्यात आलेल्या मासिक विवरणपत्राची छायांकित प्रत सादर करण्यास सुचित केले. तद्नंतर उपस्थित व्यवस्थापक महेश राठी यांनी दुरध्वनीवरुन संपर्क साधून बिल ऑफ एन्ट्रीच्या प्रती फॅक्स संदेशद्वारे त्यांच्या कार्यालयात प्राप्त करुन अधिकाऱ्यांना सादर केल्या व मासिक विवरणपत्राची छायांकित प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगून सदरचे विवरणपत्र त्यांनी संबंधित प्राधिकरणास सादर केले आहे किंवा कसे, याबाबत त्यांना अवगत नसल्याचे सांगितले.

अधिकाऱ्यांनी बिल ऑफ एन्ट्रीचे अवलोकन केले असता, ते पुढीलप्रमाणे आढळून आले.

कडधान्याचा प्रकार	बिल ऑफ एन्ट्री क्रमांक	बिल ऑफ एन्ट्री दिनांक	आयात केलेला कडधान्याचा साठा	
			साठा बाचक्यांमध्ये	साठा मे. टनमध्ये
काळे उडिद	५३८४३३०	०८/१२/२०११	१४००	११९.४३०

मसूर	८७४१७९	२९/०१/२०१०	सुटा साठा	१९६.६५०
हिरवे मुग	८५७४१४	२३/०९/२०१०	४८००	२४०.३८४
एकूण आयात केलेला कडधान्याचा साठा			६२०० व सुटा	५५६.४६४

उपरोक्त नमूद बिल ऑफ एन्ट्रीमधील आयात केलेल्या नमूद साठ्याचे प्रत्यक्षात अधिकाऱ्यांनी पंच व कंपनीचे व्यवस्थापक यांच्या समक्ष गोदाम क्रमांक २, ६ व ८ मधील मोजदाद करण्यात आलेल्या कडधान्याच्या साठ्याशी तुलनात्मक पडताळणी केली असता, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात फरक आढळून आला. सदर फरकाबाबत उपस्थित व्यवस्थापक महेश राठी यांना अधिक विचारणा केली असता, त्यांनी समाधानकारक उत्तरे न देता सदर साठ्याचा त्यांचा संबंध नसल्याचे सांगून जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला. अधिकाऱ्यांनी बिल ऑफ एन्ट्रीवरील काळे उडिदचा साठा दिनांक ०८/१२/२०११ रोजी १४०० बाचक्यांमधील ११९.४३० मे. टन नमूद असल्याचे व प्रत्यक्षात गोदामामध्ये ४६८२ बाचक्यांमध्ये २३४.१०० मे. टन साठवणूक असल्याचे, बिल ऑफ एन्ट्रीवरील मसुर हा कडधान्याचा साठा दिनांक २९/०१/२०१० रोजी सुटा असलेला १९६.६५० मे. टन नमूद असल्याचे व प्रत्यक्षात गोदामामध्ये ११५०४ बाचक्यांमध्ये ५७५.२०० मे. टन साठवणूक असल्याचे तसेच बिल ऑफ एन्ट्रीवरील हिरवे मुग हा कडधान्याचा साठा दिनांक २३/०९/२०१० रोजी ४८०० बाचक्यांमधील २४०.३८४ मे. टन नमूद असल्याचे व प्रत्यक्षात गोदामामध्ये ९७०० बाचक्यांमध्ये ४८५.००० मे. टन साठवणूक असल्याचे उपस्थित व्यवस्थापक महेश राठी यांना पंचांसमक्ष निदर्शनास आणून दिले.

तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष काळे उडिदचा ३२८२ बाचक्यांमधील ११४.६७ मे. टन, मसुरचा ३७८.५५ मे. टन तसेच हिरवे मुगचा ४९०० बाचक्यांमधील २४४.६१६ मे. टन हा सर्व साठा आयात केलेल्या बिल ऑफ एन्ट्री वरील नमूद साठ्यापेक्षा अतिरिक्त असल्याचे उपस्थित व्यवस्थापक यांच्या निदर्शनास आणून देऊन याबाबत त्यांना सदरचा साठवणूक केलेला कडधान्याचा साठा हा मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशनच्या मालकीचा असल्यास त्यापैकी मसुरचा साठा हा गेले २६ महिने तसेच हिरवे मुगचा साठा हा गेले सुमारे १८ महिने साठवणूक करण्याचे प्रयोजन काय व अतिरिक्त आढळून आलेला कडधान्याचा साठा हा कोणाच्या मालकीचा आहे ? याबाबत उपस्थित व्यवस्थापक यांना पंचांसमक्ष विचारणा केली असता, त्यांनी मोघम स्वरुपाचे असमाधानकारक विधाने करुन अधिकाऱ्यांचा जाणीवपूर्वक दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला.

मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या नमूद पत्त्यावरील गोदाम क्र. २, ६ व ८ मध्ये साठवणूक केलेल्या साठ्यापैकी व बिल ऑफ एन्ट्री वरील नमूद साठ्यापेक्षा अतिरिक्त आढळून आलेल्या साठ्याबाबत उपस्थित व्यवस्थापक महेश द्वारकानाथ राठी यांनी सदरचा साठा हा त्यांच्या गोदामात सुमारे गेले २६ महिन्यांपासून साठवणूक केला असला तरीही सदरच्या साठ्याशी त्यांचा काहीही संबंध नसल्याचे सांगून याबाबतचा जबाब देण्यास नकार दिला व

याबाबतचे परिपूर्ण पुरावादर्शक कागदपत्रे सादर न केल्याने पुढील तपासणीच्या अधिन राहून साठवणूक केलेला कडधान्याचा साठा जागीच जप्त करुन जैसे थे स्थितीत जतन करण्याचे पंचांसमक्ष मौखिक सुचना दिल्या.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी केलेली असून दिनांक २९/०३/२०१२ रोजीच्या तपासणीमध्ये जप्त करण्यात आलेला विनापरवाना तसेच विना खरेदी बिलांचा अतिरिक्त आढळून आलेला अवैध असलेला उपरोक्त मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक १०/०४/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. तथापी, मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांनी वाचावे क्र. ३ अन्वये लेखी निवेदन सादर करुन घटनास्थळी जप्त करण्यात आलेला कडधान्याचा साठा हा त्यांच्या मालकीचा असल्याचे सांगून त्यांना सुनावणीस उपस्थित राहण्याची संधी देण्याबाबत व सुनावणी लवकर लावण्याबाबत या कार्यालयात उपस्थित राहून विनंती केली. सबब, दिनांक १०/०४/२०१२ रोजी ठेवण्यात आलेली सुनावणी रद्द करुन वाचावे क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक ०९/०४/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०९/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे मार्केटिंग मॅनेजर श्री. पी.बी. मालदे, मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे सहाय्यक व्यवस्थापक श्री. एस.टी. पवार व मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या वतीने श्री. महेश द्वारकानाथ राठी हे उपस्थित राहिले. मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे मार्केटिंग मॅनेजर श्री. पी.बी. मालदे यांनी वाचावे क्र. ३ तसेच मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या वतीने श्री. महेश द्वारकानाथ राठी यांनी वाचावे क्र. ५ अन्वये यापूर्वीच दिलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांचे दिनांक ०३/०४/२०१२ रोजीच्या निवेदनामध्ये, त्यांनी त्यांच्याकडील प्राप्त झालेल्या कार्गोमधील विविध कडधान्याचा साठा मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी, वाशी येथे साठवणूक केल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन हे भारतीय सरकारचे उपक्रम असलेली कंपनी असून ती वाणिज्य मंत्रालयच्या अधिपत्याखाली विविध कडधान्याचे जगभरातून आयात निर्यात करीत असल्याचे सांगितले. केंद्र शासनाने एस.टी.सी., पी.ई.सी. व एम.एम.पी.सी. यांना विविध कडधान्ये उदा. यलो पिज, मुग, चिक पिज,

उडिद, तुर, मसुर इत्यादी साठा आयात करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले असून ज्यामुळे राष्ट्रीय बाजारपेठेत सदर साठ्याचे वितरण नियमित केल्याने कडधान्याच्या दरामध्ये स्थिरता असते. मे. एस.टी.सी. विविध कडधान्यांचे आयात करुन सदरचा साठा मुंबई व नवी मुंबईतील विविध वेअरहाऊस/गोडाऊनमध्ये साठवणूक करते. त्यांच्या कंपनीस कडधान्य व इतर वस्तूंच्या आयातीकरिता केंद्र शासनाने प्राधिकृत केले असल्याने त्यांच्या कंपनीस आयात करण्यासाठी केंद्र अथवा राज्य शासनाकडून कोणताही परवाना प्राप्त करण्याची गरज नसल्याचे सांगितले. निवेदनासोबत बिल ऑफ लेडिंग, सेल्स इन्व्हाईस इत्यादी कागदपत्रे सादर करण्यात येत असून ज्यामुळे वाशी येथील मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी येथे साठवणूक केलेला साठा हा त्यांच्या कंपनीच्या असल्याचे सिध्द होते. आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, साठवणूक केलेल्या कडधान्याच्या साठ्यास नियमितरित्या फवारणीची गरज आहे. सदर साठ्यापैकी काही साठ्याचे वितरण आदेश निर्गमित करण्यात आले असून सदर साठ्याचे संबंधीत खरेदीदारांनी अधिदान केले असल्याने त्यांना साठ्याचे वितरण करणे गरजेचे आहे. त्यामुळे संबंधीतांना आवश्यक त्या सुचना देण्यात याव्यात. जेणेकरुन वाशी येथील गोदामामधील वितरण करणे शक्य होईल, अशी विनंती केली आहे.

मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी यांचे दिनांक ०४/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनामध्ये, त्यांच्या नमूद गोदामात साठवणूक केलेला विविध वस्तूंचा साठा त्यांच्या मालकीचा नसून त्यांचा मे. एस.टी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीसोबत अंमलात असलेल्या त्रिपक्ष करारानुसार साठवणूक करीत असल्याचे सांगून त्यासंबंधीचे सर्व कागदपत्रे, अभिलेख व साठ्याचे तपशिल मे. एस.टी.सी. यांनी नेमलेल्या सर्वेअर व सी.एच.अे. हे काळजी घेत असल्याचे सांगितले. दिनांक २८/०३/२०१२ व २९/०३/२०१२ रोजी घेण्यात आलेल्या तपासणीमध्ये त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली असून उर्वरीत माहिती मे. एस.टी.सी. च्या अधिकाऱ्यांना संपर्क साधून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या दिनांक ३०/०३/२०१२ रोजी आपल्या अधिकाऱ्यांनी गोदाम सिलमुक्त करुन त्यांना कडधान्याच्या वितरण थांबविण्यासाठी तोंडी अथवा लेखी आदेश दिले नाहीत. तथापी, अधिकाऱ्यांनी विशेष करुन कडधान्याच्या वितरणासाठी मौखिक परवानगी दिलेली आहे. आपल्या पत्रामध्ये याबाबत मौखिक आदेश दिल्याचे नमूद केले असून त्यामध्ये तथ्य नाही. मे. एस.टी.सी. तसेच त्यांनी नियुक्त केलेल्या सर्वेअर व सि.एच.अे. यांच्या प्रतिनिधींन समक्ष वितरण आदेशानुसार कडधान्याचे वितरण केले जात असल्याचे सांगितले. आपल्या कार्यालयास अचुक माहिती हवी असल्यास संबंधीत व्यक्तींशी थेट संपर्क साधण्याची विनंती करुन त्यांची मदत लागल्यास त्यांनाही अवगत करण्यात यावे, असे नमूद केले आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २९/०३/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी त्यांचे अधिकारी/कर्मचारी पथक व पंचांसह मे. श्री सप्तश्रृंगी ऑईल कंपनी, ९/१२, चिराग हाऊस, सेक्टर १८, गोकूळ डेअरी जवळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०५ येथे भेट दिली असता, वेअरहाऊसमधील गोदाम क्र. २, ६ व ८ या तीनही गोदामात मोठ्या प्रमाणावर कडधान्याचा साठा साठवणूक केल्याचे आढळून आले. अधिकाऱ्यांनी सदर कडधान्याच्या साठवणूकीकरिता शिधावाटप यंत्रणेचा, अन्न व औषध प्रशासन विभागाचा अथवा संबंधित महानगरपालिका यांच्याकडून आवश्यक असणारा परवाना सादर करण्याच्या सुचना दिल्या असता उपस्थित व्यवस्थापक महेश राठी यांनी संबंधित प्राधिकरणाकडून आवश्यक परवाना प्राप्त करुन न घेतल्याचे सांगून त्याकरिता अर्जही केला नसल्याचे सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी सदरचा साठा मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशनच्या मालकीचा असल्यास साठा संबंधिचे कागदपत्र, सदर साठवणूकीकरिता मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन सोबतचा करारनामा व सदर कडधान्याच्या साठ्याचे साठवणुकीचे दिनांक व इतर तपशिल असलेले साठापुस्तक सादर करण्यास सांगितले असता, उपस्थित व्यवस्थापक यांनी सदर कडधान्याचा साठा हा मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन यांनी आयात केल्याचे सांगून सद्य:स्थितीत त्यांच्याकडे याबाबतचे कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे सांगितले. तसेच मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन सोबत कडधान्य साठवणूकीसाठी कोणताही करारनामा केला नसल्याचे सांगून त्यांच्याकडे साठापुस्तक व साठवणुकीचे दिनांक सहित तपशिलही उपलब्ध नसल्याचे सांगितल्याने अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष गोदाम क्र. २ मधील काळे उडिदचा २३४.१०० मे. टन, गोदाम क्र. ६ मधील मसूरचा ५७५.२०० मे. टन तसेच गोदाम क्र. ८ मधील हिरवे मुगचा ४८५.००० मे. टन असे मिळून एकूण २५८८६ बाचक्यांमधील १२९४.३०० मे. टन कडधान्याचा साठा पुढील आदेशापर्यंत जतन करण्याच्या मौखिक सुचना देऊन सदरचा साठा घटनास्थळी जप्त करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य व खाद्यतेल या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तथापी, "Central Government or State Government may direct the Importers to declare the receipts of stocks of these commodities and stocks retained by them" असे निर्देश दिलेले आहेत. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये डाळीसाठी साठा मर्यादा व परवाना घेण्याची आवश्यकता याबाबत लागू केलेले निर्बंध हे आयात केलेल्या डाळींसाठी लागू राहणार नाहीत. त्यामुळे

आयात केलेल्या डाळींच्या साठवणूक व प्रक्रियेसाठी व्यापाऱ्यांना परवाना घेण्याची आवश्यकता नाही. तथापी, त्यांनी आयात केलेल्या डाळीची खरेदी विक्री केल्यास यापुढे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप यांचेकडे रिटर्न्स भरावेत. रिटर्न्स भरतांना त्यामध्ये कंपनीच्या मालकाचे नांव, नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता, गोदामाचा पत्ता, सुरुवातीची शिल्लक, आयात केलेल्या डाळीचा तपशिल, विक्री केलेल्या डाळीचा तपशिल, शिल्लक साठा इत्यादींचा स्पष्ट उल्लेख असावा असे नमूद आहे. तसेच आयात डाळीची विक्री करताना पावतीवर " Imported pulses " असा स्पष्ट उल्लेख करावा व आयात केलेल्या डाळीवरील क्रमांक व दिनांक पावतीवर स्पष्टपणे नमूद करुन बिल ऑफ एन्ट्रीची एक सत्य प्रत संबंधितांना द्यावी, असे नमूद आहे.

मे. श्री सप्तश्रृंगी या कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, त्यांच्या नमूद गोदामात साठवणूक केलेला विविध वस्तूंचा साठा त्यांच्या मालकीचा नसून त्यांचा मे. एस.टी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीसोबत अंमलात असलेल्या त्रिपक्ष करारानुसार साठवणूक करीत असल्याचे सांगून त्यासंबंधीचे सर्व कागदपत्रे, अभिलेख व साठ्याचे तपशिल मे. एस.टी.सी. यांनी नेमलेल्या सर्वेअर व सी.एच.अे. हे काळजी घेत असल्याचे सांगितले. तथापी, मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनी सोबत असलेल्या त्रिपक्ष करारानुसार हे करारबध्द असल्याने त्यांच्या गोदामामध्ये केंद्र शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानातून खरेदी केलेला कडधान्यांचा साठा हा त्यांना वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या वितरण आदेशानुसार साठवणूक केलेल्या साठ्यामधून वितरण करुन व उर्वरीत शिल्लक साठ्याचे लेखाजोखा ठेवणे आवश्यक आहे. परंतू मे. श्री सप्तश्रृंगी या कंपनीच्या वतीने तपासणीच्या दिवशी घटनास्थळी तसेच सुनावणीच्यावेळीही साठापुस्तक सादर केले नाही. ही बाब गंभीर आहे.

मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीच्या वतीने सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, ते आयातदार असून त्यांचा गोदाम क्र. २ मधील काळे उडिदचा २३४.१०० मे. टन, गोदाम क्र. ६ मधील मसूरचा ५७५.२०० मे. टन तसेच गोदाम क्र. ८ मधील हिरवे मुगचा ४८५.००० मे. टन या कडधान्यांचा साठा आयात केल्याचे सांगून त्यासंबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्यांनी अथवा त्यांच्या वतीने नियुक्त करण्यात आलेल्या कस्टम हाऊस एजन्ट मे. नरेंद्र फॉरवडर्स प्रा.लि. व मे. एस.रामदास प्रागजी फॉरवडर्स प्रा.लि. तसेच घटनास्थळी साठवणूक केलेल्या मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी या केअरटेकर कंपनीकडून नियमितपणे मासिक विवरणपत्र या कार्यालयास सादर केले नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे त्यांनी केंद्र शासनाच्या अधिसुचना तसेच महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकामधील नमूद अटींचे उल्लघंन केले आहे. ही बाब गंभीर आहे.

मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. ही कंपनी भारतीय सरकारचे उपक्रम असून सदर कंपनीकडे केंद्र शासनाकडून मिळालेल्या अनुदानातून विविध कडधान्यांचा साठा हा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून खरेदी करुन सदरचा आयात केलेला साठा हा राष्ट्रीय बाजारपेठेत मुबलग प्रमाणात व योग्य दरात वितरण करण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. आयात केलेला कडधान्य/अन्नधान्याचा साठा हा खुल्याबाजारात वाजवी दराने जनसामान्यांच्या मागणीनुसार उपलब्ध करुन दिल्यास जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढ रोखण्यास मदत होते. ज्यामुळे केंद्र शासनास तसेच पर्यायाने राज्य शासनास साठेबाजी व काळाबाजारीस आळा घालणे शक्य होत आहे.

तथापी, दिनांक २९/०३/२०१२ रोजीच्या तपासणीमध्ये जप्त करण्यात आलेल्या कडधान्यांच्या साठ्याच्या पुराव्यादाखल मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीच्या मुंबई शाखेतील संबंधीत अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या बिल ऑफ लेडिंग / बिल ऑफ एन्ट्री चे अवलोकन केले असता, मसुर या कडधान्याचा साठा दिनांक ११/१२/२००९ व ०५/०२/२०१० रोजी तसेच हिरवे मुग या कडधान्याचा साठा दिनांक २७/०३/२०१० व ३१/०३/२०१० रोजी आयात केलेला साठा आजमितीस खुल्याबाजारात अथवा संबंधीत राज्यांच्या मागणीनुसार सार्वजनिक वितरण प्रणालीवर शासन नियंत्रित दराने वितरीत न करता सदरचा साठा हा सुमारे २४ ते २७ महिने मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या गोदामात साठवणूक करण्याचे प्रयोजन काय ? याबाबत साशंकता वाटते. सदर कडधान्याचा साठा हा नमूद कालावधीमध्ये साठवणूक केल्याने प्रति माह होणारा साठवणूकीचा व फवारणीचा अनावश्यक खर्च हा विनाकारण वाढत असल्याचे दिसून येत आहे. आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय बाजारपेठेत कडधान्य/अन्नधान्याचे भाव स्थिर नसल्याने प्रचलित दराने खरेदी केलेला साठा हा त्याच वेळेस तात्काळ वितरीत झाले असते, तर साठवणूक व इतर बाबींसाठी होणारा अनावश्यक खर्च सहजरित्या टाळता येणे शक्य झाले असते, अशी या कार्यालयाची धारणा आहे. तसेच कडधान्याचा साठा हा नाशवंत असल्याने सदरचा साठा हा खराब झाल्यास केंद्र शासनाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मे. एस.टी.सी. या कंपनीने आयात केलेल्या साठ्याची प्रशासकीय, वितरणासंबंधीच्या तसेच साठवणूकीच्या कामकाजाकरिता मे. नरेंद्र फॉरवर्डर्स प्रा.लि., मे. एस.रामदास प्रागजी फॉरवडर्स प्रा.लि. या कस्टम हाऊस एजन्टसची नेमणूक त्रिपक्ष करारनाम्याद्वारे करण्यात आली असून वेअरहाऊस करिता मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी यांची नेमणूक करण्यात आल्याचे करारनाम्यावरुन दिसून येत आहे. सदर त्रिपक्ष करारनाम्याचे अवलोकन केले असता, त्यामध्ये गोडावून मालक / केअर टेकर यांना ठरविण्यात आलेल्या साठवणूकीकरिता प्रति बाचक्यांचे दर नमूद नसल्याचे दिसून येत आहे. तसेच सी.एच.अे. यांना साठवणूक केलेला साठा हा मे. एस.टी.सी. यांचा असल्याबाबत फलक प्रदर्शित करण्याची, फवारणी करण्याची, साठा तपशिल ठेवण्याची जबाबदारी देण्यात आली असून घटनास्थळी वरील बाबींचा अभाव असल्याचे निदर्शनास आल्याने मे. नरेंद्र फॉरवडर्स प्रा.लि. व मे. एस.रामदास प्रागजी फॉरवडर्स प्रा.लि. यांनी त्रिपक्ष करारनाम्यामधील

अटींचा भंग केल्याचे तसेच मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. च्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणी अनावश्यक साठवणूक करुन निष्काळजीपणा केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, जप्त साठ्यापैकी काळे उडिद या कडधान्याचा साठा मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांनी बिल ऑफ लेडिंग क्र. अेएलपीवायजीएनएनएसअे ०१७३-११ दिनांक ३१/१०/२०११ अन्वये २४०० बाचक्यांमध्ये ११९.७८६ मे. टन तसेच बिल ऑफ लेडिंग क्र. अेएलपीवायजीएनएनएसअे ०१७५-११ दिनांक ३१/१०/२०११ अन्वये ३३६० बाचक्यांमध्ये १६७.४३९ मे. टन असे मिळून एकूण ५७६० बाचक्यांमध्ये २८७.२२५ मे. टन साठा आयात केल्याचे आढळून आले आहे. त्यापैकी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या वितरण आदेश क्र. ३० दिनांक २०/०१/२०१२ व ३२ दिनांक ०७/०२/२०१२ अन्वये अनुक्रमे २६२ व ७८ मे. टन असे मिळून एकूण ३४० मे. टन साठा यापूर्वीच वितरीत केल्याचे दिसून येत आहे. उपरोक्त आकडेवारी पाहता आयात साठ्यापेक्षा वितरीत साठा अधिक असल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांकडे अधिक खातरजमा केली असता, सदर गोदामामध्ये यापूर्वी साठवणूक केलेल्या साठ्याचा अंतर्भाव असल्याने काळे उडिदचा घटनास्थळी २३४.१०० मे. टन साठा आजमितीस शिल्लक असल्याचे सांगितले. तसेच सदर उर्वरीत साठ्याकरिता त्यांनी वितरण आदेश क्र. ३३ दिनांक २८/०३/२०१२ अन्वये सादर करुन २४०.००० मे. टन साठा हा हिमाचल प्रदेश, राज्य नागरी पुरवठा विभागास वितरीत करावयाचे असल्याचे सांगितले. सबब, जप्त करण्यात आलेला काळे उडिदचा २३४.१०० मे. टन साठा हा दिनांक १२/०४/२०१२ रोजीच्या आदेशान्वये मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीस परत करण्यात आलेला आहे.

तसेच जप्त साठ्यापैकी मसुर या कडधान्याचा साठा मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ८८४७८३ दिनांक ०५/०२/२०१० अन्वये ७४.५१० मे. टन सुटा साठा तसेच बिल ऑफ एन्ट्री क्र. ८८०१९३८ दिनांक ११/१२/२००९ अन्वये ५४१.९१० मे. टन सुटा साठा असे मिळून एकूण ६१६.४२० मे. टन साठा आयात केल्याचे आढळून आले आहे. त्यापैकी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या वितरण आदेश क्र. ०२७, ०२८, ०२९, ०३०, ०३१, ०३२, ०३३, ०३४, ०३५, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७७, ७८, ८०, ८३, ८४, ८५, ८७, ८८ व ९२ या एकूण २८ वितरण आदेशान्वये दिनांक ०८/१२/२०११ ते १९/०३/२०१२ या कालावधीमध्ये एकूण २१०६.००० मे. टन साठा यापूर्वीच वितरीत केल्याचे दिसून येत आहे. म्हणजेच माहे डिसेंबर, २००९ पासून आयात केलेला साठा हा माहे डिसेंबर, २०११ या दोन वर्षाच्या कालावधीत वितरण न करता अनावश्यक साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. उपरोक्त आकडेवारी पाहता आयात साठ्यापेक्षा वितरीत साठा अधिक असल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांकडे अधिक खातरजमा केली असता, सदर गोदामामध्ये यापूर्वी साठवणूक केलेल्या साठ्याचे अंतर्भाव असल्याने मसुर या कडधान्याचा घटनास्थळी ५७५.२००

मे. टन साठा आजमितीस शिल्लक असल्याचे सांगितले. तसेच सदर उर्वरीत साठ्याकरिता त्यांनी वितरण आदेश क्र. ९३ दिनांक २६/०३/२०१२ अन्वये सादर करुन २००.००० मे. टन साठा हा मे. बालाजी ग्रेन्स प्रा.लि. यांना वितरीत करावयाचे शिल्लक असल्याचे सांगितले. सबब, जप्त करण्यात आलेला मसुरच्या ५७५.२०० मे. टन साठ्यापैकी वितरीत करावयाचा २००.००० मे. टन साठा वजा जाता घटनास्थळी ३७५.२०० मे. टन साठा हा अतिरिक्त असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जप्त करण्यात आलेल्या मसुर या कडधान्याच्या एकूण ५७५.२०० मे. टन साठ्यापैकी वितरण आदेश क्र. ९३ अन्वये २००.००० मे. टन साठा हा दिनांक १२/०४/२०१२ रोजीच्या आदेशान्वये मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीस परत करुन उर्वरीत अतिरिक्त आढळून आलेला ३७५.२०० मे. टन साठा हा पुढील आदेशापर्यंत जैसेथे स्थितीत ठेवण्याचे व जतन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

तसेच जप्त साठ्यापैकी हिरवे मुग या कडधान्याचा साठा मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ९६०१२७ दिनांक २७/०३/२०१० अन्वये २४०० बाचक्यांमध्ये १२०.०१९ मे. टन, बिल ऑफ एन्ट्री क्र. ९६०१४२ दिनांक २७/०३/२०१० अन्वये ४८०० बाचक्यांमध्ये २४०.३१७ मे. टन, बिल ऑफ एन्ट्री क्र. ९६४९५४ दिनांक ३१/०३/२०१० अन्वये २४०० बाचक्यांमध्ये १२०.१२५ मे. टन, बिल ऑफ एन्ट्री क्र. ९६४९६२ दिनांक ३१/०३/२०१० अन्वये २४०० बाचक्यांमध्ये ११९.६९५ मे. टन असे मिळून एकूण १२००० बाचक्यांमध्ये ६००.१५६ मे. टन साठा आयात केल्याचे आढळून आले आहे. त्यापैकी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या वितरण आदेश क्र. १८, १९, २०, २१ व २३ या एकूण ५ वितरण आदेशान्वये दिनांक ०२/०३/२०१२ ते २६/०३/२०१२ या कालावधीमध्ये एकूण ३००.००० मे. टन साठा यापूर्वीच वितरीत केल्याचे दिसून येत आहे. म्हणजेच सदरचा साठाही सुमारे २ वर्ष अनावश्यकरित्या साठवणूक करुन वितरण न केल्याचे दिसून येत आहे. तसेच वितरण आदेश क्र. २४ दिनांक २८/०३/२०१२ अन्वये ५०.००० मे. टन साठा हा तपासणी नंतर वितरीत केल्याचे निदर्शनास आले आहे. म्हणजेच जप्त करण्यात आलेल्या एकूण ४८५.००० मे. टन साठ्यापैकी वितरण आदेश क्र. २४ अन्वये वितरीत झालेला ५०.००० मे. टन साठा वजा जाता सद्य:स्थितीत घटनास्थळी एकूण ४३५ मे. टन साठा शिल्लक असल्याचे आढळून येत आहे. एकूण आयात केलेल्या ६००.१५६ मे. टन साठ्यामधून वितरीत झालेला ३५०.००० मे. टन साठा व वितरीत करावयाचा १००.००० मे. टन साठा असा मिळून एकूण ४५०.००० मे. टन साठा वजा जाता १५०.१५६ मे. टन साठा शिल्लक असणे गरजेचे होते. तथापी, घटनास्थळी सद्य:स्थितीत एकूण ४३५.००० मे. टन साठा शिल्लक असल्याचे आढळून आल्याने एकूण १८४.८४४ मे. टन हिरवे मुगचा साठा हा अतिरिक्त असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जप्त करण्यात आलेल्या हिरवे मुग या कडधान्याच्या शिल्लक असलेल्या एकूण ४३५.००० मे. टन साठ्यापैकी वितरण आदेश क्र. २५ अन्वये १००.००० मे. टन साठा तसेच आयात केलेल्या साठ्यापैकी शिल्लक असलेला १५०.१५६ मे.टन साठा हा दिनांक १२/०४/२०१२ रोजीच्या आदेशान्वये मे.

एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीस परत करुन उर्वरीत अतिरिक्त आढळून आलेला १८४.८४४ मे. टन साठा हा पुढील आदेशापर्यंत जैसेथे स्थितीत ठेवण्याचे व जतन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सबब, उपरोक्त नमूद अतिरिक्त आढळून आलेला मसुर या कडधान्याचा ३७५.२०० मे.टन व हिरवे मुग या कडधान्याचा १८४.८४४ मे. टन साठा हा संबंधित सी.एच.अे. मे. एस. रामदास प्रागजी व मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी या केअर टेकर असलेल्या कंपन्यांनी मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन यांनी निर्गमीत केलेल्या वितरण आदेशानुसार पूर्णपणे साठा वितरीत न करता तो स्वत: जवळ गैरहेतूने संगनमत करुन अवैधरित्या बाळगल्याचे निष्पन्न होत असल्याने संबंधीतांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० चा भंग केल्याने ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०३९/२०१२ दिनांक १२/०४/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मे. एस. रामदास प्रागजी व मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी या केअर टेकर असलेल्या कंपन्यांनी संगणमत करुन घटनास्थळी असलेल्या त्यांच्या नमूद वेअरहाऊसमध्ये साठवणूक केलेल्या जीवनावश्यक वस्तुंच्या साठयापैकी मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन यांनी निर्गमीत केलेल्या वितरण आदेशानुसार मसुर व हिरवे मुग या कडधान्यांचा साठा पूर्णपणे वितरीत न करता तो स्वत: जवळ गैरहेतूने संगनमत करुन अवैधरित्या बाळगल्याचे निष्पन्न झाल्याने, त्यांनी मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीसोबत असलेल्या त्रिपक्ष करारनाम्यातील अटींचे उल्लंघन करुन त्यांनी मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीची तसेच पर्यायाने केंद्र शासनाची विश्वासार्हता गमावल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. सबब, मसुर या कडधान्याचा अतिरीक्त आढळलेला ३७५.२०० मे. टन व हिरवे मुग या कडधान्याचा अतिरीक्त आढळलेला १८४.८४४ मे. टन साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०३९/२०१२ दिनांक १२/०४/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी, जप्त करण्यात आलेला मसुर या कडधान्याच्या अतिरीक्त आढळून आलेला ३७५.२०० मे. टन साठा व हिरवे मुग या कडधान्याच्या अतिरिक्त आढळून आलेला १८४.८४४ मे. टन साठा हा शासनजमा करण्यात यावा.

२) उपरोक्त नमुद शासनजमा करण्यात आलेला साठा हा पोलिसांनी, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.
२) मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे मालक
३) मे. एस. रामदास प्रागजी
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांच्या मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ-परिमंडळ यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशाप्रमाणे जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीचे कार्यवाही करण्याकरिता पोलिसांना आवश्यक ती मदत करावी.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

F:\Amaldata-2012-30-4-2012\Ammal Aadesh\Aadesh.doc